# पुणे विद्यार्थी गृहाचे आश्रम वसतिगृह, पुणे ३०

## सन २०२०-२१ प्रवेशासंदर्भात माहिती

(दूरध्वनी क्र. : ०२०-२४४७०९२७/२४४७०५७३/२४४७९०५८)

ग्रामीण भागातील गरीब, गरजू, हुशार, सद्वर्तनी आणि अनाथ विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी वसतिगृह व शाळा या ठिकाणी प्रवेशासाठी आवश्यक माहिती खालीलप्रमाणे -

१) प्रवेश घेणारा विद्यार्थी हा इयत्ता ५वी ते ८वी यामध्ये प्रवेश घेणारा असावा.

२) दिनांक १ जून २०२० पासून संस्थेच्या punevidyarthigriha.org या वेब साईटवर प्रवेश अर्ज उपलब्ध होतील. प्रवेश अर्ज डाऊनलोड करुन सुवाच्च हस्ताक्षरात भरणे आवश्यक आहे व खालील सर्व कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करुन दिनांक १५ जून २०२० पूर्वी ईमेलने संस्थेच्या मुख्य कार्यालयाच्या ई-मेलवर पोहोचतील असे पहावे. (मूळ प्रती मुलाखतीच्या वेळी सादर कराव्या लागतील) pvgheadoffice@gmail.com

अ) विद्यार्थ्यांचे मागील ३ वर्षांचे गुणपत्रक ब) एम.बी.बी.एस. डॉक्टरांचे मेडिकल सर्टिफिकेट

क) पालकाचा उत्पन्नाचा दाखला -तलाठी/तहसीलदार ड) रहिवासी प्रमाणपत्र

इ) विद्यार्थ्यांचे पासपोर्ट साईज मधील तीन कलर फोटो

ई) दोन सद्गृहस्थ व्यक्तींचे शिफारसपत्र (सरपंच/पंचायत समिती/पोलीस पाटील)

उ) स्थानिक पालकांचे पुण्यातील नाव, पत्ता व फोन नंबर

ऊ) आई/वडील मयत असल्यास मृत्यूचा दाखला ए) विद्यार्थ्याचे आधारकार्ड

३) वसतिगृहाची सोय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी असून स्थानिक (पुणे शहरातील) विद्यार्थ्यांना संस्थेच्या नियमाप्रमाणे प्रवेश दिला जात नाही.

४) विद्यार्थ्याला किमान अ-१, अ-२ किंवा ब-१ यापैकी शेरा गुणपत्रिकेत असणे अत्यंत आवश्यक आहे.

५) दिनांक १५ जून ते३० जून २०२० प्रवेश अर्ज छाननी होईल व त्यानंतर मुलाखतीसाठी बोलविले जाईल.

६) सध्याच्या जागतिक महामारीच्या दिवसात असलेल्या लॉकडावूनचा कालावधी संपून शिक्षण मंडळाकडून शाळा सुरु होण्याच्या सुचना मिळाल्यानंतर विद्यार्थी व पालक यांना मुलाखतीसाठी बोलविले जाईल व नंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांची यादी जाहिर केली जाईल.

७) मुलाची गुणवत्ता, पालकाचे उत्पन्न व ग्रामीण भागातील शिक्षणाची अपुरी सुविधा हीच खरी प्रवेशासाठी शिफारस म्हणून गृहीत धरली जाईल.

८) विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचे सर्व अधिकार वसतिगृह व्यवस्थापनाचे असतील.

९) वसतिगृहामध्ये सर्व जाती-धर्माच्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. विद्यार्थ्यांच्या पालकांकडून एकाच नियमाप्रमाणे योग्य तो कमीत कमी भोजनखर्च घेतला जातो. तो सर्वांना समान असून दोन हप्त्यात भरावा लागतो. (वार्षिक, निवास व भोजन खर्च रु. १५,०००/- प्रवेश फी रु. १००/-, वाचनालय फी रु. १००/- व इतर फी रु. १०००/- असे एकूण रु. १६,२००/- यापैकी प्रवेशसमयीच एकरकमी रु. ८,७००/- भरावे लागतात व निवास भोजन खर्चाचा दुसरा हप्ता रु. ७५००/- नोव्हेंबर २०२० अखेरीस भरावा लागेल.

अर्ज

दिनांक :

प्रति,
मा.संचालक
पुणे विद्यार्थी गृहाचे आश्रम वसतिगृह,
१७८६, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३०.
यांसी, स. न. वि. वि.

अर्जदार : ------------------------------------

विषय - माझ्या पाल्यास वसतिगृहात प्रवेश मिळणेबाबत ..

माझा पाल्य चि. ----------------------------------- हा इयत्ता ---- मध्ये शिकत होता. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी माझ्या पाल्यास आपल्या संस्थेच्या आश्रम वसतिगृहात राहून महाराष्ट्र विद्यालयात शिक्षण घ्यावयाचे आहे. संस्थेच्या सर्व अटी व शर्ती मला व माझ्या पाल्यास पूर्णपणे माहीत असून त्या आम्हांस मान्य आहेत. माझ्या पाल्याची (विद्यार्थ्याची) माहिती पुढीलप्रमाणे -

१) विद्यार्थ्याचे संपूर्ण नाव - -----------------------------------------------

२) जन्मतारीख - ---------- ३) प्रवेशाची इयत्ता ------------------------

३) पालकाचे संपूर्ण नाव - ---------------------------------------------------

४) पत्रव्यवहाराचा पत्ता - ---------------------------------------------------
---------------------------------------------------------------------

५) पालकाचा व्यवसाय - ----------- ६) पालकांचा फोन/मोबाईल नं. ---------------

६) स्थानिक पालकांचे नाव/पत्ता/फोन नं. - -----------------------------------
----------------------------------------------------------------------

माझ्या पाल्याकडून संस्थेच्या वसतिगृहाच्या व शाळेच्या नियमांचे उल्लंघन झाल्यास त्या क्षणी संस्थेचे व्यवस्थापन जो निर्णय घेईल तो माझ्यावर व माझ्या पाल्यावर बंधनकारक राहील. या अर्जातील सर्व माहिती मी व पाल्याने संपूर्ण वाचलेली असून ती सत्य आहे आणि ती आम्हांस पूर्णपणे मान्य आहे.

तरी कृपया माझ्या पाल्यास संस्थेच्या वसतिगृह व शाळेत प्रवेश मिळावा ही नम्र विनंती. कळावे,

आपले,

विद्यार्थ्याची स्वाक्षरी      स्थानिक पालकांची स्वाक्षरी      पालकांची स्वाक्षरी

अर्जासोबत पुढील कागदपत्रांच्या झेरॉक्स जोडाव्यात - १) मागील वर्षाचे गुणपत्रक २) विद्यार्थ्याचे आधारकार्ड
३) विद्यार्थ्याचे पासपोर्ट साईज मधील तीन फोटो